# समर्थन

## पुरवणी मागण्या विश्लेषण
## मार्च, २०१५

**समर्थन**
११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानका समोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ९८९२९३९६१७/९९६७७२२९०७.
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

**-संपादक-**

मुक्ता भारती

**-विश्लेषक-**

**रुपेश कीर -९८९२९३९६१७**
**गुरुनाथ सावंत -९९६७७२२९०७**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. ठाणे -४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे 'समर्थन'**

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

## ठळक वैशिष्टे:

- मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु.३ हजार ५३६ कोटी ९६ लाख २० हजारांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत.
- पुरवणी मागण्या केलेल्या एकूण २२ विभागांच्या ४० मागण्यापैकी ०५ विभागांच्या रु. २ हजार ६३८ कोटी ५८ लाख ३५ हजार रकमेच्या १३ पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून उर्वरित रु. ८९८ कोटी ३७ लाख ८५ हजार रकमेच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होतील. वरील २ हजार ६३८ कोटी ५८ लाख ३५ हजार रकमेच्या मागण्यांवरील चर्चेसाठी २ दिवस देण्यात आलेले आहेत.
- एकूण पुरवणी मागण्यांमध्ये महसुली स्वरुपाच्या रु. ३ हजार ३४४ कोटी १० लाख ६२ हजारांच्या मागण्या आहेत. तर रु. १९२ कोटी ८५ लाख ५८ हजाराच्या भांडवली स्वरुपाच्या मागण्या आहेत..
- मार्च, २०१४ मध्ये अंतरिम अर्थसंकल्प रु. २ लाख १३ हजार ४६२ कोटींचे होते.
- जून, २०१४ मध्ये अतिरिक्त अर्थसंकल्प रु. १० हजार ५९४ कोटींचे होते त्यानंतर वर्ष २०१४-१५ चे मूळ अर्थसंकल्प रु. २ लाख २४ हजार ५६ कोटींचे झालेले आहे.
- आकस्मिकता निधीतून ५ बाबींअंतर्गत काढण्यात आलेली रक्कम रु.२ हजार ७ कोटी २८ लाख आहे, जी पुरवणी मागणीच्या तुलनेत ५६.७५% इतकी आहे.
- वर्ष २०१४-१५ मध्ये जून २०१४, डिसेंबर २०१४ व मार्च, २०१५ च्या मिळून एकूण ४ हजार ३८० कोटी २० लाख रुपयांचा निधी आकस्मिकता निधीतून काढण्यात आले आहेत ही रक्कम एकूण पुरवणी मागणीत ३२ हजार ७६ कोटी ८३ लाख रुपयांच्या प्रमाणात १३.६५% आहे.
- महसूल व वन विभागाने ४ मागण्यांतर्गत २ हजार १८८ कोटी ९० लाख रुपये, वित्त विभागाने ३ मागण्यांतर्गत ६९२ कोटी ५० लाख रुपये, नगर विकास विभागाने २ मागण्यांतर्गत २५१ कोटी ५१ लाख रुपये, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग १४४ कोटी ९१ लाख तसेच ग्रामविकास व जलासंधारण

**विभाग १०२ कोटी ८८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केल्या आहेत एकूण पुरवणी मागण्यांमध्ये या ५ विभागांच्या पुरवणी मागण्यांचे प्रमाण ९५ % एवढे प्रचंड आहे.**

## मार्च, २०१५ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

*तक्ता क्र. १* *रु. लाखात*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | ६४७२२.३६ | २६९६८८.२६ | ३३४४१०.६२ |
| भांडवली | १६५३७.४७ | २७४८.११ | १९२८५.५८ |
| **एकूण** | **८१२५९.८३** | **२७२४३६.३७** | **३५३६९६.२०** |

- मार्च २०१५ मध्ये वर्ष २०१४-१५ साठी ३ हजार ५३६ कोटी ९६ लाखरुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या २ हजार ७२४ कोटी ३६ (७७.०३%)लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या ८१२ कोटी ५९ (२२.९७%)लाखाच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

## मूळ मागणीच्या तुलनेत वर्षभरातील पुरवणी मागणीचे प्रमाण १३ टक्के

*तक्ता क्र. २* *रुपये कोटीत*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|
| फेब्रुवारीव जून एकत्रीत २०१४ मुळ मागणी | २२४०५६.६२ | ८७.४८ |
| जून, २०१४ पुरवणी मागणी | २०३३८.०२ | ७.९४ |
| डिसेंबर, २०१४ पुरवणी मागणी | ८२०१.८५ | ३.२० |
| मार्च, २०१५ पुरवणी मागणी | ३५३६.९६ | १.३८ |
| **एकूण मागणी** | **२५६१३३.४५** | **१००.००** |

- मुळ अर्थसंकल्प व जून, डिसेंबर व मार्च अधिवेशनामध्ये अर्थसंकल्प २०१४-१५ साठी करण्यात आलेल्या पूरवणी मागण्यांची एकत्रीत रक्कम २लाख ५६ हजार १३३ कोटी ४५ लाख एवढी प्रचंड आहे.
- एकूण मागणीशी तुलना करता तीन्ही अधिवेशनातील पुरवणी मागणीची रक्कम ३२ हजार ७६ कोटी ८३ लाख (१२.५२%) एवढी झाली आहे.
- सर्वात जास्त पुरवणी मागण्या जून, २०१४ च्या अधिवेशनामध्ये करण्यात आल्या असून एकूण मागणीत या पूरवणी मागणीचे प्रमाण (७.९४%) आहे.

## दोन दिवसात २ हजार ६३८ कोटी ५६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

*तक्ता क्र. ३* *रु. कोटीत*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| **१६ मार्च, २०१५** | | | | |
| महसुल व वन विभाग | ४ | २१८८.९० | ४७४४.२४ | ४६.१३ |
| नगर विकास विभाग | २ | २५१.५१ | ६०३६.९९ | ४.१६ |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्रा. | १ | १४४.९१ | ३३१३.६९ | ४.३७ |
| **१७ मार्च, २०१५** | | | | |
| गृह विभाग | ३ | ७.११ | १३३४१.८९ | ०.०५ |
| उच्च व तंत्र शिक्षण | ३ | ४६.१३ | ६९७०.९५ | ०.६६ |
| **५** | **१३** | **२६३८.५६** | **३४४०७.७६** | **७.६६** |

- अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१५-१६ मध्ये २०१४-१५ च्या शेवटच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या यामध्ये २२ विभागांच्या ३ हजार ५३६ कोटी ९६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यां केल्या आहेत. त्यापैकी महसुल व वन, नगर विकस, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, गृह व उच्च व तंत्र शिक्षण या **५ विभागांच्या २ हजार ६३८ कोटी ५६ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून १७ विभागांच्या ८९८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विनाचर्चा मंजूर केल्या जातील.**

**<u>पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत:</u>**

''विधानमंडळात पूरक मागण्यांवर फक्त २ दिवस चर्चेला असतात. या २ दिवसात फक्त ८ विभागांची चर्चा होते. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्यांच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट आहे म्हणजे साधारणत: ६ तास एकूण २८९ सदस्यांना उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याचदा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बहुतेकदा चर्चा न करता विधानमंडळांकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे''.

बहुतांश पुरवणी मागण्या या खर्चाला औपचारिक मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या असतात. याचा अर्थ अर्थसंकल्पाला मंजुरी देताना विधिमंडळ ज्या खर्चाना मान्यता देते त्यासाठी रक्कम उपलब्ध न होता राजकीय हितासाठी केलेल्या पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. असे असेल तर नियोजन, अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया या औपचारिकता ठरतात. विधिमंडळाच्या 'अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या अधिकारा'चा तो संकोच आहे. चर्चेशिवाय संमत होणाऱ्या पुरवणी मागण्या ही एक शासनाच्या अर्थसंकल्पातील गंभीर बाब असुन त्यावर विरोधी पक्षाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण याच कारणाने शासनाचा पुरवणी मागण्यांबाबतचा गैरव्यवहार वाढत चालला आहे. म्हणुन पुरवणी मागण्यांवर चर्चा होण्याकरिता काहिना काही तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

## सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र.* *४ रु. कोटीत*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणिचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| महसुल व वन विभाग | ४ | २१८८.९० | ४७४४.२४ | ४६.१३ |
| वित्त विभाग | ३ | ६९२.५० | ४९६७५.५१ | १.३९ |
| नगर विकास विभाग | २ | २५१.५१ | ६०३६.९९ | ४.१६ |
| अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १ | १४४.९१ | ३३१३.६९ | ४.३७ |
| ग्रामविकास व जलसंधारण | ३ | १०२.८८ | ९२४९.२३ | १.११ |
| **५** | **१३** | **३३८०.७०** | **७३०१९.६६** | **४.६३** |

- वर्ष २०१४-१५ साठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ३ हजार ५३६ कोटी ९६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी महसुल व वन, वित्त, नगर विकास, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, तसेच ग्रामविकास व जलसंधारण या **५ विभागांनी मिळून १३ मागण्यांतर्गत ३ हजार ३८० कोटी ७० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केल्या आहेत एकूण पुरवणी मागणीत हे प्रमाण ९५.५८%** आहे.
- **महसुल व वन या विभागाने सर्वाधिक २ हजार १८० कोटी ९० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केल्या असून एकूण पुरवणी मागणीत त्यांचे प्रमाण ६२ % आहे.**
- **महसुल व वन विभागाने आवर्षण ग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानीमुळे मदत करण्यासाठी २००० कोटी रुपये आकस्मिकतानिधीतून दिले आहेत.** तर नैसर्गीक आपत्तीमुळे बाधा पोहचलेल्या शेतकऱ्यांना ११४ कोटी ९२ लाख रुपये देण्यात आले आहेत. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी ३ कोटी रुपये. तसेच आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्यासाठी ९ कोटी १३ लाख रुपयांची मदत देण्यासाठी काढण्यात आले आहेत.
- महसुल व वन विभागाची वर्ष २०१४-१५ ची मुळ मागणी ४ हजार ७४४ कोटी २४ लाख रुपयांची होती त्या तुलनेत मार्च २०१५ च्या चालु अर्थसंकल्पीय अधिवेशनात केलेली पुरवणी मागणी ही २ हजार १८० कोटी ९० लाख रुपयांची म्हणजे ४६.१३% आहे.

## आकस्मिकता निधीतून काढलेल्या रकमा

*तक्ता. क्र. ५* — *रु. कोटीत*

| अ.क्र. | विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महसूल व वन | ७ | २०१४-१५ या वर्षात आवर्षण ग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानीमुळे मदत. | २०००.०० |
| २. | महसुल व वन | ९ | वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई | ३.०० |
| ३. | कृषी प.दु.म. | १० | राष्ट्रीय आयुष अभियान-औषधी वनस्पती यांची अंमलबजावणी. | ४.०० |
| ४. | नगर विकास | १७ | स्वेच्छाधीन निर्णयाअंतर्गत सदनिकांच्या वितरणासंबंधी झालेल्या गैरव्यवहारबाबत उच्च न्यायलयाच्या आदेशानुसार नेमलेल्या चौकशी समितीच्या खर्चासाठी तरतूद. | ०.२५ |
| ५. | जलसंपदा | २६ | पुणे महानगपालिकेला पाण्याच्या पुनर्वापराकरिता कालव्याच्या बांधकामांचा खर्च भागविण्यासाठी तरतूद. | ०.०३ |
| | | | **एकूण** | **२००७.२८** |

- वर्ष २०१४-१५ साठी अर्थसंकल्पीय अधिवेसनात एकूण ३ हजार ५३६ कोटी ९६ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत त्यापैकी **आकस्मिकता निधीतून ५ विभागाअंतर्गत २००७ कोटी २८ लाख रुपये काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ५७ टक्के आहे.**
- सन २०१५ च्या आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्याचा अध्यादेश युती शासनानेही काढला आहे. **यावेळी आकस्मिकता निधीची रक्कम १५० कोटी रुपयांवरून २ हजार १५० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे.**
- **राष्ट्रीय आयुष अभियान ही केंद्राची योजना असून त्यासाठि केंद्र शासनाकडून १०० % अनुदान राज्य शासनाल मिळत असते व त्यासाठी राज्य शासनाने ४ कोटी रुपये राखून ठेवणे गरजेचे असताना आकस्मिकता निधीतून पैसे काढण्या हे अर्थसंकल्पीय नियमाचा भंग आहे.**
- **जलसंपदा विभागाअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या पाण्याच्या पुनर्रवापरा करिता कालव्याच्या बांधकामासाठी आकस्मिकता निधीतून ३ लाख काढण्यात आले आहेत हा अकल्पीत किंवा तातडिचा खर्च होऊ शकत नाही. त्यामुळे आत्ताच्या शासनाने तरी अशा प्रकारे आकस्मिकता निधीचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.**

## आकस्मिकता निधीतून गेल्या वर्षभरात काढण्यात आलेल्या एकूण रकमा

*तक्ता क्र. ६* *रु. कोटीत*

| वर्ष २०१४-१५ पुरवणी मागणी | आकस्मिकता निधीची रक्कम | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| जून, २०१४ | २३६०.०० | २०३३८.०२ | ११.६० |
| डिसेंबर, २०१४ | १२.९२ | ८२०१.८५ | ०.१५ |
| मार्च, २०१५ | २००७.२८ | ३५३६.९६ | ५६.७५ |
| **एकूण** | **४३८०.२०** | **३२०७६.८३** | **१३.६५** |

- वर्ष २०१४-१५ मध्ये तीन्ही अधिवेशनात मिळून ३२ हजार ७६ कोटी ८३ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. तर या पुरवणी मागण्यांमध्ये आकस्मिकता निधीचा खर्च भागविण्यासाठी ४ हजार ३८० कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत.
- जून २०१४ मध्ये आकस्मिकता निधीचा खर्च भागवीण्यासाठी २ हजार २६० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या होत्या त्याचे एकूण पुरवणी मागण्यांशी प्रमाण ११.६०% होते.
- सर्वात जास्त आकस्मिकता निधीचा वापर मार्च २०१५ मध्ये केला गेला असून त्यावेळच्या ३ हजार ५३६ कोटी ९६ लाख रुपयांच्या एकूण पुरवणी मागणिच्या तुलनेत २ हजार ७ कोटी २८ लाख रुपये एवढी रक्कम आकस्मिकता निधीचा खर्च भागविण्यासाठी काढण्यात आली ही रक्कम ५६.७५% एवढी प्रचंड आहे.

## आकस्मिकता निधीवरील अंदाजसमितीची शिफारस

अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करावयाची झाल्यास पुरवणी मागणी करता येते.

''अतिरिक्त खर्च समायोजित करण्यासाठी शासनाकडून आकस्मिकता निधीची मूळ मर्यादा तात्पुरत्या स्वरुपात बऱ्याचदा वाढविण्यात येते. पुष्कळदा असा खर्च सत्ताधारी पक्षाच्या राजकीय गरजा व अत्यावश्यक गोष्टी भागविण्यासाठी केला जातो. त्यामुळे विधानमंडळाचे प्राधिकार धोक्यात येतात...'' गोडबोले समितीच्या या मताशी सहमती दर्शवित अंदाज समितीने पुढील शिफारस केली. ''आकस्मिकता निधितून रक्कम काढण्यासंबंधी एक नियमावली तयार करण्यात यावी व त्यात कोणत्या परिस्थितीमध्ये व कोणत्या प्रकारा अंतर्गत किती रक्कम काढण्यात येईल याबाबत विशिष्ट असे निकष घालून द्यावेत जेणेकरुन या फंडाचा गैरवापर टाळता येईल.'' परंतु अजूनपर्यंत अशा प्रकारची नियमावली राज्य शासनाने तयार केलेली नाही.

*स्त्रोत— अंदाज समितीचा अहवाल, २००१*

**अंदाज समतीने वरील शिफारस २००१ साली केली होती. तरी आत्ताचे संवेदनशील शासन या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल टाकेल व अर्थसंकल्पात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करेल ही अपेक्षा.**

**प्रलंबीत देयके:**

**बाब क्र. ३६** नुसार स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळांना वसतीगृह अधिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आल्यामुळे दिन.१ जानेवारी, १९९६ ते दिनांक ३१ मार्च २०१५ या १९ वर्षाच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीचे माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रदान करण्यासाठी १३ कोटी १६ लाख ८८ हजार एवढा निधी देण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आली आहे. तसेच

**बाब क्र.४१** नुसार पुरवठा समग्री त्यामध्ये वैद्यक महाविद्यालये व रुग्णालये यांसाठी औषधे, शस्त्रक्रिया उपकरणे, रसायने व ऑक्सीजन यांच्या प्रलंबित देयकाचे प्रदान करण्यासाठी २३ कोटी ६ लाख २६ हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. या दोन्ही मागण्या प्रलंबित देयकाचे प्रदान करण्यासाठी करण्यात आल्या आहेत.

# गृह विभाग
## पूरक मागणी क्र. बी-१
## २०५५, पोलीस

**बाब क्र.१ :** सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेश भत्ता प्रदान करण्यासाठी २३ कोटी ९ लाख २८ हजार रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली असून हा खर्च मंजूर आनुदानातून भागवीणे शक्य असल्याने २००० रुपयांची लाक्षणिक मागणी करण्यात आली आहे.

१) राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांचा खर्च शासनाने पुरवणी मागण्याद्वारे भागविला असला तरी आजही **राज्यातील १ लाख ३३ हजार ४५१ पोलीस कर्मचारी व अधिकारी शासकीय घरांपासून वंचित आहेत.** अशा स्वरुपाची माहिती मला प्राप्त झाली आहे. कर्तव्याबाबत दक्ष असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटुंबाची अशी परवड होणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. आपल्यासारख्या संवेदनशील शासनाने याबाबीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे असे मला वाटते.

२) **मुंबई आयुक्तालयाचा विचार करता २० हजार २६४ पोलीस कर्मचारी आजही घरांच्या प्रतिक्षेत आहेत.** शासनाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार **मुंबई पोलीस अधिकाऱ्यांसाठी २ हजार १५२ निवासस्थानाची गरज असताना २ हजार ३००० निवासस्थान बांधली गेलीत** म्हणजे १४८ अतिरिक्त निवासस्थाने बांधली गेली आहेत. मात्र तळागाळातील पोलीस शिपायांचे मात्र आपल्या शासनाने हाल चालवले आहेत. ४१ हजार ६९४ पोलीस कर्मचाऱ्यांपैकी केवळ २१ हजार ५७८ पोलीस कर्मचाऱ्यांना शासन घर उपलब्ध करून देऊ शकले आहेत. **उर्वरित २० हजार २६४ पोलीस कर्मचाऱ्यांना आपले शासन कधी न्याय देणार आहे याचे उत्तर सदनाला देण्यात यावे.**

## महसूल व वन विभाग

## पुरक मागणी क्र. सी-७

## २४०६, वनीकरण व वन्य जीवन

**बाब क्र.९:** वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी ३ कोटी आकस्मिकता निधीतून काढण्यात आले आहेत त्याची भरपाई करण्यासाठी १००० रुपयांची लाक्षणिक पुरवणी मागणी.

१) **ऑगस्ट २०१४ रोजी निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यात वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीला मोठ्या प्रमाणावर विलंब होत आहे.** या कायद्याअंतर्गत अनेक मंजूर दावे प्रत्यक्षात मान्य केले नाहीत. व्यक्तीगत प्रलंबित दावे गहाळ झालेले दावे. प्रलंबित अपील, कारकुनी चूकांमधून प्रलंबित प्रकरणे अशी अनेक प्रकरणे आज शासन दरबारी प्रलंबित आहेत. नव्याने निर्माण झालेल्या या पालघर जिह्यात आज अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. या जिल्ह्यात आदिवासी समाजाची लोकसंख्या लक्षणिय आहे. आपले शासन यांच्या मागण्या सोडविण्यासाठी कोणती कारवाई करणार आहे. याचे उत्तर सदनाला मान.मंत्र्यांनी द्यावे.

## नगर विकस विभाग

## पुरक मागणी क्र. एफ-३

## २२५१, नगरविकास

**बाब क्र.१७:** स्वेच्छाधिन निर्णया अंतर्गत सदनिकांच्या वितरणा संदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत नेमलेल्या चौकशी समितीचा खर्च भागवीण्यासाठी २५ लाख १२ हजार रुपये आकस्मिकता निधीतून काढण्यात आले, त्याचा खर्च भागविण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आली.

१) स्वेच्छाधिन निर्णया अंतर्गत सन्दनिकांमध्ये झालेला भ्रष्टाचार लक्षात घेता शासनाने गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आज म्हाडाने गिरणी कामगारांच्या पहिल्या टप्प्यातील ९२५ घरांचे वाटप करायचे होते त्यापैकी केवळ ७७ टक्के घरांचेच वाटप झाले आहे. तसेच १ लाख ४८ हजार गिरणी कामगार आजही आपल्याला हक्काचे घर मिळेल यासाठी शासना बरोबर संघर्ष करत आहेत. मोर्चे आंदोलने चालु आहेत. तरी या प्रश्नाबाबत आपले संवेदनशील शासन काय कारवाई करणार आहे.

२) मुंबईतील वांद्रे शासकीय वसाहतीची आमच्या काळातील पुनर्विकास योजना रद्द केली व आपण याबाबत निवन पुनर्विकास योजना आणनार आहात. वांद्रे येथे ९५ एकरावर शासकीय वसाहत आहे. त्यात शासकीय कर्मचारी राहत असलेले ४८०० घर आहेत. तर आपण याबाबत आजपर्यंत कोणती कारवाई केली आहे. येथे राहणाऱ्या रहिवाशांना मालकी हक्काची घरे देणार अहात कि नाही. याबाबत सभागृहाला आश्वासीत करावे.

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## पुरक मागणी क्र. एम-२

## २४०८-अन्न साठवण व वखार साठवण

**बाब क्र.३५:** सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अन्नधान्याच्या व्यवहारातील तूट भरून काढण्यासाठी १४४ कोटी ९१ लाख ८५ हजाराची तरतूद करण्यात आली आहे.

१) **राज्यात, अन्न सुरक्षा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी विद्यमान सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अंतर्गत राज्यातील १ कोटी ७७ लाख दारिद्रय रेषेखालील लोकांना वगळण्यात आले आहे. एकूण लोकसंख्येशी तुलना करता ही लोकसंख्या १९ टक्के एवढी आहे. तरी राज्य शासनाने केंद्र शासनावर दबाव आणून या सदर दारिद्रय रेषेवरील लोकांचा समावेश अन्न सुरक्षा योजने अंतर्गत करून घेणे गरजेचे आहे हे आपले शासन करणार आहे का? त्याचप्रमाणे.**

२) सद्याच्या केंद्र शासनाकडून राज्याला मागणीच्या तुलनेत केवळ २८ टक्के एवढाच केरोसीनचा पुरवठा केला जात आहे **त्यामुळे राज्यात ७२ टक्के केरोसीनची कमतरता निर्माण झाली असून काळाबाजार व अनागोंदी निर्माण झाली आहे.** राज्यात मागणीच्या स्वरुपात केरोसीन कमी मिळत आहे. **याबाबत मान.मंत्री गिरीह बापट यांना विचारले असता** त्यांनी सांगितले की, केंद्राकडे याबाबत पाठपूरावा चालु आहे. परंतु राज्यातील शिधावाटप दुकानांमध्ये आजही टंचाई सदृष्य वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे जनसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे तो दूर करण्यासाठी तुम्ही कोणती कारवाई करणार अहात.

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## पुक मागणी क्र. डब्लु-२

## २२०२, सर्वसाधारण शिक्षण

**बाब क्र.५०:** विविध विद्यापीठांचा वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी ४ कोटी १३ लाख १८ हजारांची अतिरिक्त तरतूद.

राज्याने अमरावती, सोलापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व विधी विद्यापीठ यांच्या वेतन व वेतनेतर खर्चासाठी पुरवणी मागणी केली आहे. असे असले तरी **राज्यभरात सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील ५०० हून अधिक शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्या जागा त्वरीत भरण्याचे मान. उच्च न्यायालयाचे आदेश असूनही त्यासाठी आपल्या शासनाने आणखी ६ महिन्यांची मुदत मागीतली होती याबाबत आपल्या सरकारने केलेली याचिका उच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळून लावली आहे. वारंवार मुदत देऊनही त्याबाबत काहीच धोरण न आखण्याची कृती म्हणजे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असून आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मुदतवाढ देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशा शब्दात न्यायालयाने आपल्या शासनाला फटकारले आहे.** याबाबत आपण आत्तापर्यंत काय धोरण आखले किती रिक्त जागा भरल्या वा त्या रिक्त जागा भरण्याचा प्रयत्न केलात याचे मान. मंत्र्यांनी सभागृहाला उत्तर दयावे.